संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# राममंदिर प्रश्नी सहमतीतून समारोपाकडे

**सर्वोच्च** न्यायालयाने रामजन्मभूमीविषयी सामोपचाराने मार्ग निघावा किंवा सहमतीतून या वादाचा समारोप व्हावा असा प्रयत्न केलेला दिसतो. मध्यस्थ समिती नेमून आठ आठवड्यांमध्ये त्याबाबतचा सर्वसमावेशक तोडगा सर्वोच्च न्यायालयापुढे सादर व्हावा असाही निर्देश दिला गेला आहे. याचा अर्थ लोकसभा निवडणुकीनंतर राम जन्मभूमीवादाचा समारोप होईल असे समजायला हरकत नाही. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच रामजन्मभूमीसंदर्भात अशाप्रकारे मध्यस्थांमार्फत सहमतीचा तोडगा सुचवण्याचा प्रयत्न झालेला आहे. या समितीत माजी न्यायमूर्ती कपिल खलिफुल्ला तसेच आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर, श्रीराम पांचू आणि कायदेतज्ज्ञांचा समावेश आहे. आज रामजन्मभूमी प्रकरण एका निर्णायक टप्प्यावर येऊन पोहचले आहे. समितीने आपल्या बैठका या शक्य तो गोपनिय ठेवाव्यात आणि त्याबाबतचा अहवालही गोपनिय ठेवून तो न्यायालयाला सादर व्हावा असाही प्रयत्न न्यायालयाने आपल्या आदेशातून केला आहे. याचा अर्थ यासमितीच्या बैठका होत असताना त्यातील चर्चेमुळे वातावरण बिघडू नये. किंबहुना या वादावरचा सर्वसमावेशक तोडगा काढणे लवकरात लवकर शक्य व्हावे असाच त्यामागचा उद्देश दिसतो. सर्वोच्च न्यायालयाने सुरु केलेली ही प्रक्रिया एका निर्णायक परिस्थितीचाच भाग ठरते. कारण ज्यावेळेला दोन्ही पक्षकारांकडून या समितीसाठी काही नावे मागितली गेली होती. त्यातली काही नावे स्वीकारून त्यांच्यावर जबाबदारी टाकण्याचा निर्णय जेव्हा घेतला जातो तेव्हा राम जन्मभूमीचा हा अहवाल ९० टक्के संपुष्टात आल्यासारखी परिस्थिती ठरते. आता केवळ या समितीने उपलब्ध झालेली अनुकुलता पूर्णावस्थेला कशी जाईल असे कौशल्य दाखवले पाहिजे. या विषयाशी संबंधित दोन्ही प्रमुख पक्षकारांनी न्यायालयाचा हा निर्णय स्वीकारलेला आहे. फक्त एक दोन संघटनांनी श्री श्री रविशंकर यांच्या नावाबाबत आक्षेप घेतलेला दिसून येतो. परंतु त्याला तसा काही अर्थ उरत नाही जर या वादासंबंधात न्यायालयाचा निर्णय अंतिम मानू असे दोन्ही पक्षकारांकडून सांगितले गेले आहे. म्हणजेच ते सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय स्वीकारायला तयार आहेत मग आता सर्वोच्च न्यायालयाने मध्यस्थ नेमून त्याच अंतिम निर्णय प्रक्रियेची सुरुवात केली आहे.

### व्यापक भूमिका

अयोध्येत प्रभू रामाचा जन्म झाला. ज्याठिकाणी तो झाला त्याठिकाणीच मंदिर उभारले गेले पाहिजेत. असा देशभरातून आग्रह धरला जातो. किंबहुना त्यासाठी गेली सत्तरवर्षे आंदोलन सुरु आहे. देशातील बहुसंख्य लोकांची ही भावना लक्षात घेऊन या वादावर तोडगा काढला जावा असे प्रयत्न सुरु होते. आता भारतीय संविधान प्रक्रियेत किंवा लोकशाही राज्यव्यवस्थेत न्यायालयांना विशेष स्थान असेल तर त्यांनी सुचवलेले उपायदेखील स्वीकारले पाहिजेत. हा प्रश्न रामजन्मभूमीचा प्रश्न हा श्रध्देचा मुद्दा असून कुठल्याही मालमत्तेशी किंवा संपत्तीशी संबंधित नाही. आता रामजन्मभूमी परिसरात जी काही जागा आहे त्या जागेची वाटणी कशी करायची किंवा मूळ राममंदिरासाठी किती जागा उपलब्ध करून द्यायची. उरलेल्या जागेचे काय करायचे, अशा मुद्दांवर समितीला विचार करावा लागेल. प्रामुख्याने गेल्या तीन चार वर्षात राम मंदिराला असलेला मुस्लिम समाजाचा विरोध कमी करण्यामध्ये बऱ्यापैकी यश मिळाले. जर कोट्यवधी हिंदूंची ही एकमेव मागणी असेल तर त्यासाठी मुस्लिमांनी दुराग्रह सोडावा किंबहुना त्यांनी पुढाकार घेऊन राममंदिर उभारण्याकरीता साहाय्यभूत व्हावे. असेही प्रयत्न केले गेले. त्यालासुध्दा बऱ्यापैकी यश आल्याचे सांगितले जाते. दहा वर्षांपूर्वी असलेला विरोध आता इतका तीव्र राहिलेला नाही. कारण राम जन्मभूमीचा उपयोग राममंदिरासाठी होणे हे उद्दीष्ट साध्य होत असेल तर उरलेल्या जागेविषयीचा वाद हा सामोपचाराने संपुष्टात येऊ शकतो. बदललेली ही मानसिकता लक्षात घेऊनच न्यायालयाने या संदर्भात संवादातून सहमतीची आणि सहमतीतून या वादाच्या समारोपाची प्रक्रिया सुरु केलेली आहे. स्वाभाविकपणे सर्वोच्च न्यायालयाने मध्यस्थ नेमण्याचा दिलेला निर्णय हा या एकूण प्रक्रियेतला एक भाग आहे तो काही अंतिम निर्णय नाही. मध्यस्थांची समिती जो उपाय सुचवेल तो सर्वोच्च न्यायालयालाही बंधनकारक असेल असेही कुठे म्हटलेले नाही. परंतु समितीने असेच प्रयत्न करावेत. की त्यातून अंतिम निर्णय आकाराला येऊ शकेल. न्यायालयाची ही भूमिका म्हणजे प्रचंड ताणल्या गेलेल्या सर्वात मोठ्या वादाला संपवण्यासाठी घेतलेला पुढाकार ठरतो. आता या मध्यस्थांच्या समितीला विरोध करण्याचे तसे कारण उरत नाही.

### प्रत्येकाला न्याय

यासंदर्भात आतापर्यंत वेगवेगळे उपाय झालेले आहेत. यापूर्वी अलाहाबाद उच्च न्यायालयानेसुध्दा राम जन्मभूमीवर दोन्ही पक्षकाराने एकत्र येऊन तोडगा काढावा असे सुचवले होते. त्याचाच हा पुढचा टप्पा ठरतो. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आतापर्यंत या वादाचा दोन्ही पक्षकारांनी राजकारणासाठी वापर करून घेतला तो होऊ नये. या प्रश्नाचे गांभीर्य कायम राहावे किंबहुना राजकारणविरहित म्हणजेच सामाजिक जाणिवेतून या प्रश्नाकडे बघितले जावे हेही या सर्वोच्च न्यायालयाच्या या प्रयत्नातून दिसून येते. म्हणूनच हाही एक प्रयोग ठरतो. मात्र न्यायालयाने स्वीकारलेली व्यापक भूमिका विशेष नोंद घेण्यासारखी आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी याबाबतचा निर्णय होऊ नये त्याचे कोणतेही राजकीय किंवा सामाजिक पडसाद उमटू नयेत किंबहुना कोणालाही त्याचा राजकीय फायदा घेता येऊ नये याची पुरेपूर काळजी सर्वोच्च न्यायालयाने घेतली आहे. यामधून न्यायालयाची तटस्थता आणि राष्ट्रहित जपण्याचा प्राधान्यक्रमही अधोरेखित होतो. रामायणाचे संदर्भ जरी घेतले तरी त्यातून रामाला घडलेला वनवास आणि तो संपवून जनतेच्याच आग्रहास्तव स्थानापन्न झालेले राज्य हाच तर त्याचा शेवट होता तर मग अयोध्येत राममंदिर असाच याही वादाचा समारोप होऊन प्रत्येकाला न्याय मिळाल्याची भावना निर्माण होऊ शकते.